धावते नवनगर | नवी मुंबई

# देशासाठी शहीद झालेल्या वीरांचे स्मरण नव्या पिढीने देखील करणे गरजेचे

## माजी महापौर जयवंत सुतार यांचे मत

■ नवी मुंबई, प्रतिनिधी

देशाच्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेनुसार नवी मुंबईसह संपूर्ण देशभरामध्ये स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव विविध कार्यक्रमांनी आणि सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात येत आहे. आपल्या भारत देशाला इंग्रजी राजवटीपासून मुक्त करण्यासाठी अनेक शूरवीरांनी आपल्या प्राणाची आहुती दिली आहे. शूरवीरांचे स्मरण नव्या पिढीने देखील करायला पाहिजे, असे मत नवी मुंबईचे माजी महापौर जयवंत सुतार यांनी व्यक्त केले.

भारतीय जनता पार्टी प्रभाग क्र.३२ आयोजित स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव निमित्त प्रसिद्ध नेत्रतज्ञ डॉ.सुहास हळदीपुरकर (लक्ष्मी आय इन्स्टिट्यूट पनवेल) यांच्या सहकार्याने मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू चिकित्सा शिबीर आज रविवारी स्वातंत्र्याच्या पूर्वसंध्येला आयोजित करण्यात आले होते. भारतीय जनता पार्टी जनसंपर्क कार्यालय शिवाजीनगर, नेरुळ येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात माजी महापौर जयवंत सुतार बोलत होते.



सदर शिबिराचे उदघाटन नवी मुंबईचे महापौर जयवंत सुतार यांच्या शुभहस्ते व प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. इयत्ता १०वी व १२वी मध्ये उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार देखील करण्यात आला.

याप्रसंगी भाजपाचे महामंत्री डॉ. राजेश पाटील, माजी नगरसेविका माधुरी सुतार, ओबीसी मोर्चा महाराष्ट्र सचिव राजेश नरेश पाटील, समाजसेवक जयेंद्र सुतार, प्रभाकर ठाकुर, विजय नाईक, जयेश पवार, वार्ड अध्यक्ष सुभाष जाधव, महिला वार्ड अध्यक्षा सिमा रिडलान, समाजसेवक सुरेश सदावर, वंचितचे वार्ड अध्यक्ष अशोक मनोहर, प्रभागातील प्रमुख पदाधिकारी भारत गपाट, सतीश कदम, लक्ष्मण नायकवडी, दिनेश जाधव, नारायण जाधव, नामदेव सावंत, वासुदेव ताठे, दत्तात्रय पाटील, प्रभाकर भालेराव, रवी डोंगरे, संतोष गुप्ता, राहुल मंडळ, दिनेश सुतार, राकेश इंगळे, अरुण राठोड, रोहित सावंत, गणेश ननावरे, शिवाजी ननावरे, पांडुरंग जाधव, विकास पाटील, प्रमोद निकाळजे, अनिता पाटील, सायली चांदे, वैशाली जाधव, मनिषा कदम, लक्ष्मी आय इन्स्टिट्यूट पनवेलचे डॉ.गौतम पवार, पाचघरे, श्रुती गायकवाड, रोशनी अलीमकर, वैष्णवी जवांजल, अमन साळवी तसेच प्रभागातील कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी बोलताना भाजपाचे महामंत्री डॉक्टर राजेश पाटील म्हणाले की शिरवणे परिसरामध्ये अल्प उत्पन्न गटातील नागरिकांसाठी नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. ज्यांना मोतीबिंदू आढळला आहे त्यांच्यावर मोफत शस्त्रक्रिया करून त्यांना पूर्णपणे बरे करण्यासाठी मार्गदर्शन केले जाणार आहे.शिरवणेनंतर शिवाजीनगर या कामगार वर्ग असणाऱ्या ठिकाणी माजी जयवंत सुतार यांनी नेत्र तपासणी राबवून एक सामाजिक बांधिलकी जपल्याबद्दल त्याचे डॉक्टर राजेश पाटील यांनी आभार मानले. शिवाजीनगर सारख्या परिसरामध्ये माजी महापौर जयवंत सुतार यांच्या माध्यमातून नागरिकांना मुलभूत सुविधा देण्यात यश आले आहे यापुढे देखील त्यांच्या माध्यमातून आणि भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून शिवाजीनगरचा कायापालट करण्यात येईल, असा विश्वास डॉक्टर पाटील यांनी व्यक्त केला.